# WHT NOW आणि HSNC विद्यापीठाची भागीदारी :

# सायबर–सुरक्षित विद्यार्थी घडवण्याची पुढाकार

**मुंबई :** सायबर गुन्ह्यांचा वाढता धोका ओळखून आणि तरुण पिढीला याबाबत जागरूक करण्याच्या उद्देशाने, WHT NOW या स्वयंसेवी संस्थेने मुंबईतील HSNC विद्यापीठासोबत भागीदारी केली आहे. या सहकार्याद्वारे, विद्यापीठातील विद्यार्थ्यांना सायबर चोरट्यांचे सामान्य डावपेच ओळखणे आणि त्यापासून स्वत:चे डिजिटल संरक्षण कसे करायचे याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे

ही भागीदारी WHT NOW च्या नॅशनल यूथ ॲम्बेसेडर प्रोग्रॅमचा एक भाग आहे, ज्याअंतर्गत संस्थेचा उद्देश देशभरातील ५,००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना या वर्षअखेरपर्यंत प्रशिक्षण देण्याचा आहे. सायबर बुलिंग, सेक्स्टॉर्शन, ओळख चोरी यासारख्या गुन्ह्यांमध्ये वाढ लक्षात घेऊन हा उपक्रम गेल्या महिन्यात सुरू करण्यात आला आहे. HSNC विद्यापीठ हा या परिवर्तनात्मक प्रवासात WHT NOW चा पहिला भागीदार ठरला आहे.

हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना केवळ स्वत:चे संरक्षण करण्यासाठी नव्हे, तर आपल्या सहकाऱ्यांना, कुटुंबीय आणि समाजाला देखील मदत करता यावी यासाठी तयार करण्यात आला आहे.

WHT NOW संस्थेच्या संस्थापक नीती गोयल म्हणाल्या, ''आम्ही अलीकडेच HSNC विद्यापीठासोबत सामंजस्य करार केला असून लवकरच प्रत्यक्ष काम सुरू होईल. या उपक्रमांतर्गत सायबर सुरक्षा तज्ज्ञ, कायदेशीर सल्लागार आणि मानसिक आरोग्य तज्ज्ञांच्या सहभागाने विद्यार्थ्यांसाठी सत्रं आयोजित केली जातील. या सत्रांमधून सायबर गुन्ह्यांचे प्रकार, भावनिक परिणाम आणि कायदेशीर उपाय यांचा समावेश असलेले सर्वंकष प्रशिक्षण दिले जाईल.''

WHT NOW चे सह–संस्थापक आणि AU कॉर्पोरेट ॲडव्हायझरी ॲंड लीगल सर्व्हिसेसचे संस्थापक अक्षत खेतान म्हणाले, ''सायबर गुन्हेगारी ही कॅन्सरप्रमाणेच आहे – शांतपणे, आक्रमकपणे आणि बहुधा अज्ञात राहून नुकसान होईपर्यंत अनेकदा दुर्लक्षित केले जातात. कर्करोगावरील उपचारांसारखे कायदेशीर उपाय उपलब्ध असले तरी, ते अशा किंमतीवर येतात जे नेहमीच परवडणारे किंवा प्रत्येकासाठी उपलब्ध नसतात. कायदा न्यायासाठी एक चौकट प्रदान करतो, परंतु जागरूकता आणि वेळेवर कारवाई महत्त्वाची आहे.''

HSNC चे सहसंस्थापक व AU कॉर्पोरेट ॲडव्हायजरी ॲण्ड लीगल सर्व्हिसेसचे संस्थापक अक्षत खेतान म्हणाले, ''सायबर गुन्हे हे कॅन्सरप्रमाणे गुपचूप आणि वेगाने वाढत आहेत. न्यायासाठी कायदेशीर उपाय उपलब्ध आहेत, पण ते खर्चिक आणि सर्वांसाठी सुलभ नाहीत. त्यामुळे सजगता आणि वेळेवर कारवाई करणे अत्यंत आवश्यक आहे.'' ते पुढे म्हणाले, '' HSNC विद्यापीठासोबतच्या भागीदारीतून आम्ही विद्यार्थ्यांना सायबर फर्स्ट रिस्पॉन्डर्स म्हणून घडवू इच्छितो - जे पीडिताला ओळखतील, मदत करतील आणि मार्गदर्शन करतील. हे तरुण पुढारी समाजात सायबर जागरूकतेचा प्रसार करतील.''

WHT NOW विद्यापीठाच्या कुलगुरू कर्नल डॉ. हेमलता के. बागला म्हणाल्या, ''आजच्या डिजिटल युगात बँक फसवणूक, बनावट अटक आदेश आणि युद्ध वा देशभक्तीच्या नावाखाली पैसे उकळण्याचे प्रकार फारच गंभीर झाले आहेत. हे केवळ फसवणुकीचे प्रकार नाहीत, तर भावनात्मक फसवणूक आहे जी भीती आणि विश्वासाचा गैरफायदा घेते.''

WHT NOW सोबतची ही भागीदारी केवळ शैक्षणिक नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या डिजिटल, भावनिक आणि सामाजिक सुरक्षेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. आमचा उद्देश केवळ सुरक्षित महाविद्यालय नाही, तर सुरक्षित डिजिटल जीवन निर्माण करणे आहे,'' असे त्या म्हणाल्या.

सायबर छळ व ऑनलाईन त्रासाच्या प्रकरणांसाठी WHT NOW ने राष्ट्रीय हेल्पलाइन ९१–९०११११५११५ सुरू केली आहे, जिथे तत्काळ मदत, सल्ला व योग्य मार्गदर्शन दिले जाते